International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 5.136
Vol.4 No.3 Jan - Feb 2017

# माहूरची लेणी

**प्रा. डॉ. जाधव दत्ता उध्दव**

**इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक**

**श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, माहूर, जी़ नांदेड**

Email: jadhavdu24@gmail.com

**प्रस्तावना :**

माहूर शहराला प्राचीन काळापासून ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. माहूर शहर नांदेड जिल्ह्यातील तालुकाचे ठिकाण आहे. पैनगंगा नदीच्या दक्षिणी भागात सह्याद्रीच्या पर्वत रांगातील डोंगर माथ्यावर वसलेले आहे. भौगोलिक दृष्ट्या माहूर नगर अक्षांश १९.४५ उत्तर रेखांश ७७.५३ पूर्व वसले आहे. समुद्रसपाटी पासून २६०० फुट ऊंचीवर आहे. महाराष्ट्रातील साडेतीन देवीशक्ती पीठापैकी माहूरची रेणुकादेवी मुळ शक्तिपीठ आहे. चालुक्य राष्ट्रकूट, यादव, गोंड, मोगल आणि उदाराम देशमुख यांची सत्ता माहुर नगरावर होती. या सत्तेने माहूर या ठिकाणी ऐतिहासिक वास्तूची बांधणी केलेली आहे. त्यात माहूरचा डोंगरी किल्ला, वेगवेगळया पंथाचे मंदिर, मठ आणि दर्गा आहेत. तसेच जलस्त्रोत मात्रृतिर्थ, भानुतिर्थ, ईजांळा तलाव, भोजंती तलाव आणि अनेक बारव आहेत.भारतात जैन, बौद्ध आणि हिंदू धर्म पंथीयांचे लेणी कोरलेली आहेत. त्यात बौद्ध धर्मीयांची लेण्याची संख्या जास्त प्रमाणात आहे. पर्वत रांगेतील खडक खोदून तयार केलेली गृहाला लेणी असे म्हणतात.

लेणी ही संज्ञा सामान्यपणे मानव निर्मित कोरीव गृहाला वापरली जाते. भारतात खडकातून कोरलेली सुमारे बाराशे लेणी आहेत. सर्वात जास्त महाराष्ट्रात आहे. भारतातील लेण्याच्या सर्वसाधारण काळ तिसरे शतक ते नववे शतक असा मानला जातो. प्राचीन भारतात बौद्ध, जैन आणि हिंदू

धर्माच्या पंथाचे प्रचार-प्रसारासाठी एकमेकाशी संघर्ष करीत होते. मोर्य काळात बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला तर राष्ट्रकुट काळात जैन आणि हिंदू धर्माला राजाश्रय होते. गुप्त काळात अनेक पंथाचे उदय झाले. या पंथानी मूर्तीला महत्त्व देऊन सगुण देवता तयार करण्यात आल्या. गुप्त काळात हिंदू धर्माच्या देव-देवतांच्या मूर्तीचे, त्यांची वाहने आणि शस्त्रे यांचे निश्चित रूप प्राप्त झाले. त्या रूपामध्ये त्यांचे अंकन करण्यात आले. गुप्तकाळात बनवलेल्या सोन्याच्या विष्णुमूर्ती स्थानक आणि प्रसन्न मुद्रा मध्ये दिसून येतात. विष्णूचे दहा अवतार करण्यात आले. दहा अवतारामध्ये वेगळया मूर्तीची अंकन करण्यात आले. यात वराह, गरुड, नरसिंह, गोवर्धन कृष्ण व राम इत्यादी प्रसिद्ध अवतार तयार करण्यात आले. तसेच शिवमुर्तीचे लिंग व मानवी रूप असे दोन्हीच्या रूपात आहेत. तसेच जैन धर्माच्या पार्शवनाथाच्या डोक्यावर नागफणा केले गेले. चोवीस तीर्थंकराच्या मूर्तीच्या खाली दोन चिन्हाच्या मधोमध चक्राचे अंकन केलेली पाहावयास मिळते. गुप्तकाळात सर्वप्रथम जैन धर्मात मूर्ती बनवण्यास सुरुवात झाली नंतर बौद्ध धर्मात आणि शेवटी हिंदू धर्मात मूर्ती बनविण्यात आलेली होती. प्राचीन काळात व्यापारी, सार्थवाहक, बंजारा यांच्यासाठी धर्मशाळा, लेणी, व्यापारी मार्गावर विश्रांतीसाठी उभारण्यात येत असत. गोर बंजारा समाज प्राचीन काळापासून व्यापार करीत होता. याच्यांकडे भरपूर पैसे आणि मौल्यवान धातूची आभूषणे असायची. यांनी आपल्या सुरक्षेसाठी आणि विश्रांतीसाठी आपल्या कारागिराकडून लेण्या कोरून घेत असत. लेण्या खोदण्यासाठी बंजारा व्यापारांनी देणग्या दिल्याच्या उल्लेख येतो.प्रत्येक लेणी व्यापारी मार्गावर आहेत. लेणी कोरणाऱ्या कारागिरांना व्यापारी गोर बंजारे आर्थिक मदत करीत होते. लेणीच्या वैशिष्टपूर्ण ठिकाणी पावसाचे पाणी साठविण्यासाठी खडकांमध्ये खोदलेले असंख्य पाण्याचे झरे आहे. गोर बंजारा समाज जवळ भरपूर गाई, बैल आणि इतर पाळीव प्राणी असत यासाठी चारा आणि पाण्याची व्यवस्थाची आवश्यकता होती. म्हणून पाण्याच्या झरे जवळ डोंगरच्या उत्तारीवर झर्याच्या पाण्याचा धाराने झिरपून कठीण झालेल्या खडकावर लेण्या कोरण्यात आल्या आहेत. लेण्यात मूर्ती, चित्रे आणि शिल्पे लेणीची शोभा वाढविण्यासाठी कारागीर कोरत असे. मानवी भावभावना या मुर्ती, शिल्पे आणि चित्रातून व्यक्त केले गेले. गोर बंजारा समाज भारतभर व्यापारासाठी फिरत होता. भारतातील वेगवेगळया धर्माच्या तत्वज्ञानाने

प्रभावित होते. भारताच्या ज्या भागात ज्या धर्माचा प्रभाव जास्त होता. तेथे त्या धर्माचे तत्वज्ञान स्वीकारून त्यांचा प्रचारही करीत असत. एका ठिकाणी एक महिना ते एक वर्षापर्यंत थांबत होते. त्यांनी थांबलेल्या ठिकाणी आपली राहण्याची व्यवस्था करीत असताना शैलगृहे कोरुन घेत होते. त्यांना एखाद्या युद्धाच्या रसद पुरवण्यासाठी, दुष्काळ ग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी अचानक शैलगृहे सोडून जात असे. त्यामुळे काही शैलगृहे आजही अर्धवट कोरलेली आहेत. कारागिरांकडून शैलगृहे कोरुन्याचे राहून जात असे. त्यांच्या अचानक ते ठिकाण सोडल्याने होत असे. बंजारा समाजाची वस्ती डोंगर कड्यावर वसलेली असते. या लेण्या गोर बंजारा समाजाला परिचित होत्या. गोर बंजारा समाजाच्या महिलांच्या अलंकार, आभूषणे आणि लेण्यातील दगडावरील स्त्रिया मुर्ती वर कोरलेले अलंकार, आभूषणे यात साम्य दिसते. तसेच आजही गोरबंजाराच्या होळीच्या गीतातून त्याला लेंगी म्हणतात त्यातून बंजारा समाज या लेण्यातील नग्नावस्थेतील चित्रण आपल्या गीतातून व्यक्त करताना दिसतात. म्हणून लेण्यातील कोरलेले शैलगृहे, मुर्ती, चित्रे आणि शिल्पे कोरलेल्या आहेत, त्या सगळया कोरीव काम बंजारा समाजातील कलाकृतीचा एक प्रकार आहे.

आठव्या शतकात भारतामध्ये अफगाणिस्तानातून अरबांच्या आक्रमणे झाली. आक्रमणकारी इस्लाम धर्माचे होते. इस्लाम धर्माचे सर्व तत्त्वज्ञान हे भारतातील जैन, बौद्ध आणि हिंदू धर्म यापेक्षा एकदम उलट होते. म्हणून इस्लाम धर्माला थोपविण्यासाठी भारतातील धर्म पंथीयांनी एकजूट झाले. धर्म पंथीयांनी लेणी शिल्पांमध्ये सर्व धर्माचे एकत्र शिल्पे कोरले गेले..यात बौध्द, जैन आणि हिन्द धर्माचं एकत्रीकरण दिसते. भारतात मुस्लीम सत्ता दीर्घकाळ होती. त्याने कोणत्याही लेणीशिल्पात हस्तक्षेप केले नाही.

महाराष्ट्रात प्रमुख्याने सातवाहन, वाकाटक आणि राष्ट्रकूट या राजवटींच्या काळात लेण्या कोरलेल्या आहेत. महाराष्ट्रातील अजिंठा, कारले, कान्हेरी, घारापुरी, पितळखोरे, भाजे, वेरूळ, अजिंठा आणि माहूरलेणी आहेत. लेण्यांमध्ये विहार, चैत्यगृह आणि मंदिरे यांचा समावेश आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटिश संशोधकांनी महाराष्ट्रातील लेणीच्या अभ्यास करायला सुरुवात केली. ब्रिटिश

संशोधकांनी लेणीचा संशोधन केलेला असला तरी तो पुरेसा नाही. अजूनही महाराष्ट्रातील लेणी शिल्पावर संशोधन होणे बाकी आहे.

**माहूरच्या लेणीच्या खोतकामाचा इतिहास**

माहूरच्या बसस्थानकापासून दोन किलोमीटर अंतरावर शहराच्या उत्तरेला एका डोंगररांगेतील टेकडीवर सुमारे 170 फुटापर्यंत माहुरलेणी कोरलेली आहे. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील कला आणि स्थापत्याचे अभ्यासक प्राध्यापक वॉल्टर स्पिंक यांनी इसवी सन 1964 मध्ये माहूर लेणीचा सर्वप्रथम शोध लावला होता. सदर लेणी 12 जानेवारी 1953 रोजी औरंगाबाद पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात देण्यात आली. माहूर लेणीत हिंदू, बौद्ध आणि जैन धर्माच्या मुर्ती शिल्पे कोरलेली आहेत. लेणीचे खोदकाम तीन राजवटीत झाले आहे. सातवाहन काळात बौद्ध लेणी, वाकाटकांच्या राजवटीत हिंदू आणि राष्ट्रकुटांच्या काळात जैन लेणी कोरण्यात आली आहे.

**माहूरची सातवाहन कालीन बुद्ध लेणी.**

माहूरच्या लेणी समूहात लेणी क्रमांक तीन ही कला स्थापत्याच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय ठरते. ही लेणी पूर्वाभिमुखी आहे. लेण्याचे खोदकाम सुबक आणि सफाईदार आहे. सभामंडप, गर्भगृह आणि गर्भगृहाच्या भोवती मोठा प्रदक्षिणापथ आहे. लेणीचे विधान सभामंडपाचा वरांडा आणि मुख्य सभामंडप असे दोन भाग पाडता येतात. छताला आधार दिलेले आठ स्तंभ आहेत. हे स्तंभ एकाच ओळीत आहेत. या आठ स्तंभाच्या थोडे पुढे व्हरांड्याच्या मध्य भागात आणखी दोन स्तंभ आहेत. समोरच्या भागात असलेल्या आठ स्तंभ पैकी आज केवळ एकच स्तंभ पहावयास मिळतो. बाकीचे सात स्तंभ नष्ट झालेले असून आज त्यांचे केवळ तळ खड्याचे अवशेष आढळतात. हे सर्व स्तंभ चौकोनी आकाराचे असून त्यावर कोरीव शिल्पकाम केलेले आढळते. व्हरांड्यात दोन कोरीवकाम केलेले स्तंभ आहेत या स्तंभाचे तडे चौकोनी आहेत. तलखडा ते स्तंभशीर्ष यांच्या दरम्यानच्या भागावर कोरीवकाम केलेले आहे. स्तंभ शीर्षावर तीन पारट आहेत. या स्तंभाची उंची 15 फूट आणि आकार 3 फूट 6 इंच चौरस फूट आहे. वरांड्याची दक्षिण उत्तर लांबी 74 फूट आहे. पूर्व-पश्चिम रुंदी 27 फूट आहे. आणि जमिनीपासून छतापर्यंतची उंची 15 फूट आहे

समोर नैसर्गिक प्रांगण आहे. यानंतर सभामंडप लागतो हा सभामंडप दक्षिण-उत्तर 74 फूट लांब तर पूर्व-पश्चिम 19 फूट रुंद आणि 15 फूट उंचीचा आहे. वरांड्यात जसे 8 स्तंभ एकाच ओळीत आहेत. त्याचप्रमाणे सभामंडपात एकाच ओळीत आठ स्तंभ आहेत. स्तंभ चौकोनी आकाराचे आहेत. या स्तंभाची उंची 15 फूट आणि रुंदी 3 फूट 6 इंच आहे. त्या प्रत्येक स्तंभावर चारही बाजूने विविध प्रकारची शिल्पे कोरलेली आहेत. वराड्यासहित सभामंडपाची दक्षिण उत्तर लांबी 74 फूट आहे. पूर्व-पश्चिम रुंदी 40 फूट आणि जमिनीपासून छतापर्यंतची उंची 15 फूट आहे. सभामंडपात अठरा स्तंभ आहेत त्यापैकी दोन स्तंभावर सुंदर कोरीवकाम आहे. या लेणीत मध्यभागी गर्भगृह आहे. हे गर्भगृह पूर्वाभिमुख आहे. त्याला मध्यभागी प्रवेशद्वार असून त्यांची रुंदी 4 फूट 6 इंच आणि उंची 8 फूट आहे. या प्रवेशद्वाराच्या चौकटीवर मध्यभागी स्त्री मुर्ती आहे. यांच्या दोन्ही बाजूस विविध प्रकारची शिल्पे कोरलेली आहेत. यामध्ये मुष्टीयोध्दयाचे शिल्पे, प्राणी शिल्प आणि पुरुष शिल्प विशेष उल्लेखनीय आहेत. गर्भगृहाचे दक्षिणोत्तर लांबी 17 फूट चार इंच, पूर्व-पश्चिम रुंदी 16 फूट 9 इंच आणि छताची उंची 15 फूट आहे. गर्भगृहात चौकोनी चबुतरा आहे त्यावर नंतर स्थानिक लोकांनी शिवलिंग कोरले आहे. उत्तराभिमुख असून तिची लांबी चार फूट तीन इंच व रुंदी दोन फूट तीन इंच आहे. शिवलिंगाची उंची एक फूट नऊ इंच आणि त्यांचा व्यास तीन फूट एक इंच आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस भव्य द्वारपाल कोरलेले आहेत. त्यांची उंची 12 फूट आहे. गर्भगृह भोवती प्रचंड आकाराचा प्रदिक्षणापथ आहे. या प्रदिक्षणापदाची दक्षिण उत्तर रूंदी 12 फूट, पूर्व पश्चिम लांबी 41 फूट 6 इंच, उंची 13 फूट आहे. गर्भगृहाच्या पाठीमागच्या प्रदिक्षणापदाची पूर्व पश्चिम रूंदी 12 फूट आणि दक्षिण उत्तर लांबी 51 फूट आहे. प्रदिक्षणापदाची 134 फुट आहे. रुंदी 12 फूट आणि 13 फुट उंच आहे. या लेणीतील सभामंडप, गर्भगृह चैत्यगृह, विहार मुर्ती स्पष्टपणे दिसत नसले तरी पितळखोरा येतील सातवाहनांच्या काळात बौद्ध लेण्यासारखे कोरलेल्या आहेत. माहूर व परिसरात सातवाहनांच्या मांडलिक राजा भोजिक यांचे राज्य होते. भूलजा गावात सातवाहन कालीन नाणे मिळाले आहेत. भूलजा गाव माहूरच्या दक्षिणेकडे 15 किलोमीटर अंतरावर आहे. माहूरच्या परीसरात सातवाहनांची सत्ता होती. सातवाहन राजाने हिंदू, बौद्ध व जैन धर्माला राजाश्रय दिला होता. सातवाहन काळात प्रमुख्याने

सह्याद्रीच्या पर्वतरांगेत लेण्या कोरण्यात आल्या. सातवाहन काळात अजिंठा, भाजे, कार्ले, कान्हेरी, पितळखोरा आणि नाशिक या ठिकाणी बौद्ध धर्मीय लेणी कोरल्या आहे. नागार्जुन व आर्यदेव हे दोन बौद्ध पंडित सातवाहन काळात होऊन गेले. नागार्जुन आणि सातवाहन राजा विजय सातकर्णी यांची मैत्री होती. म्हणूनच सातवाहनाच्या काळात माहूर येथे बौद्ध लेणी कोरण्यात आली आहे.

**माहूर येथील वाकाटक कालीन हिंदू धर्मीय लेणी.**

माहूर येथे वाकाटक काळात हिंदू लेणी कोरण्यात आलेली आहे. या लेणीची दक्षिण उत्तर लांबी 12 फूट, पूर्व-पश्चिम रुंदी 10 फूट आणि छताची उंची 12 फूट आहे. या लेणीत दक्षिण-उत्तर तीन फूट रुंदीचे आणि पूर्व-पश्चिम दहा फूट लांबीचे लहान गर्भग्रह आहे. या गर्भगृहात एक चौथरा खोदलेले आहे. त्या गर्भगृहाच्या छताची उंची अकरा फूट आहे. या लहान आकाराच्या गर्भगृहात गणेश शिल्प कोरलेले आहे. हे गणेश शिल्प चतुर्भुज आहे. हे शिल्प भिंतीत कोरलेल्या असून त्यांची उंची 122 सेंटीमीटर आहे. आणि एक रिकामे दालन आहे. यामध्ये कसल्याही प्रकारचे स्तंभ आणि कोरीवकाम आढळत नाही. या लेणीतील सभामंडप आणि चतुर्भुज गणेश शिल्पे अजिंठा येथील लेणी क्रमांक सोळाशी साम्य दिसते. वाकाटक घराण्याची राजधानी वत्सगुल्म म्हणजेच आजचे वाशिम येथे होती. या घराण्याने सन 250 ते 550 पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटकांनी कला व स्थापत्य कलांना महत्त्व दिले. त्यांनी अनेक लेणी कोरुन घेतले होते. या सगळया हिंदू धर्मीय लेण्या आहेत. अजिंठ्याच्या लेणी क्रमांक 16 वाकाटक कालीन असून. यात एक वाकाटक कालीन शिलालेखात आहे. शिलालेखावरून वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेशी माहिती मिळते. माहूरच्या लेणी वाकाटक राजा हरीसेन काळात कोरलेली आहे. वाकाटक वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते.

**माहुरची राष्ट्रकूट कालीन जैन धर्मीय लेणी.**

राष्ट्रकुटाच्या काळात माहूर येथे जैन धर्मीय लेणी कोरण्यात आली. मराठवाड्यात राष्ट्रकुटाच्या काळात उस्मानाबाद, जिंतूर आणि माहूर येथे जैन धर्मीय लेणी कोरण्यात आल्या आहेत. राष्ट्रकूट राजाची विदर्भात अचलपूर येथे एक शाखा होती. आठव्या शतकाच्या सुमारास राष्ट्रकुट राजा गोविंद दुसरा यांनी

माहुर परीसरात दिगंबर मुनींना काही गावे दान दिल्याचा उल्लेख आढळतो. माहूर या ठिकाणी दत्त दिगंबर नावाने तो जैन धर्मीयांचे प्रचार करीत होता. माहूर येथे राष्ट्रकुटांच्या काळात जैन धर्मीय लेणी कोरण्यात आले आहेत. माहुरची जैन धर्मीय लेणी उत्तराभिमुख कोरलेले आहे. या लेणीसमोर मोठे प्रांगण आहे. समोरच्या भागात प्रवेशद्वार आहे. लेणी रचना उस्मानाबाद आणि जिंतूर जैन धर्मीय लेणी सारखे आहे. त्याच प्रकारचे गृह केलेले आहेत. एका लेणीत पार्श्वनाथाची मूर्ती कोरलेली आहे. या मूर्तीच्या डोक्यावर पाच नागफणी आहे. यासारख्यी मूर्ती कुशाण राजवटीच्या काळात जैन धर्मीय तीर्थकराच्या अंकन करण्यात आले आहेत. ही मुर्ती पद्मासन, स्थानक ध्यानमृद्रीत आहे. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील कला आणि स्थापत्याचे अभ्यासक प्राध्यापक वॉल्टर स्पिंक यांनी इसवी सन 1964 मध्ये माहूर येथील लेणी चा सर्वप्रथम शोध लावला होता आणि त्यावर प्रकाश टाकला होता त्यानेच या लेण्याचे प्रथम पुरातत्त्वीय सर्वेक्षण केले आणि त्यांच्या खोदकामाचा कालखंडही ठरविला त्यांच्या मते या लेणीचे खोदकाम राष्ट्रकूट काळात झाले असावे. धाराशिव घारापुरी आणि माहूर येथील लेण्यात स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने साम्य दिसते या लेण्याचे खोदकाम राष्ट्रकूट काळात झाले आहे. त्यावरून माहूर येथील लेणी ही राष्ट्रकूट काळातील असल्याचे सांगितले जाते. डॉ. प्रभाकर देव यांनी या लेणीचा उल्लेख पांडवलेणी म्हणून केला आहे. या परिसरात महाभारत काळात पांडवाचे वास्तव्य होते अशी आख्यायिका या भागात प्रचलित असल्यामुळे या लेणी पांडवलेणी म्हणून ओळखल्या जातात. माहुरची लेणी शिल्पे हिंदू बौद्ध आणि जैन धर्मीय आहे.

**सांराश**

माहूरची लेणी शिल्पे हे सातवाहन काळात बौद्ध, वाकाटक काळात हिंदू आणि राष्ट्रकुटच्या राष्ट्रकुटांच्या काळात जैन मूर्ती शिल्पे कोरण्यात आलेली आहे. माहूरच्या लेण्यांना पांडवलेणी म्हणून ओळख आहे. युरोपियन वास्तुकलाचे प्राध्यापक संशोधक वॉल्टर स्पिंक यांनी सर्वप्रथम लेण्याचे सर्वेक्षण केले. त्यांनी या लेण्या राष्ट्राच्या काळातील असल्याचे उल्लेख केला आहे. इसवी सनाच्या सहाव्या ते आठव्या शतकाच्या काळात या लेण्यात कोरण्यात आल्या आहेत असे उल्लेख केला जातो. माहूरची लेणी

व्यापाराच्या मदतीने बांधल्या गेल्या आणि हे व्यापारी कारागिरांना आर्थिक मदत देऊन हे शैलगृहे कोरुन घेतले होते. कारागीर अचानक तेथून निघून गेल्यानंतर लेणीचा कोरीव काम अर्धवट राहिले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


1. बॅनर्जी जे. एन - द डेव्हलपमेंट ऑफ हिंदू ऐकोनोमिक – कलकत्ता, 1956.
2. देव पी. आर. – टेंपल्स ऑफ मराठवाडा - जयपुर पब्लिकेशन - स्कीम,1993.
3. गुप्ता पी. एल. – गुप्ता एम्पायर वाराणशी विश्वविद्यालय पब्लिकेशन, 1990
4. श्रीवास्तव ब्रजभूषण- प्राचीन भारतीय प्रतिमा , मूर्तिकला-वाराणसी विश्वविद्यालय प्रकाशन
5. शर्मा ब्रजनाथ - जैन प्रतीमा दिल्ली इंडोलोगिकल बुक हाऊस कॉपोरेशन. 1979.
6. गुप्ते जगदीश - प्रागैतिहासिक भारतीय चित्रकला पर्याग 1964.
7. माटे एम्. श्री. मराठवाड्यातील शिल्प वैभव, मुंबई, 1964.
8. पाठक अं. श. संपादित - महाराष्ट्र राज्य गॅझेटियर - महाराष्ट्र शासन, 2002
9. डॉ. अनिल कठारे - भारतीय कलेचा इतिहास - सुधीर प्रकाशन वर्धा, 2008
10. डॉ. दत्ता उध्दव जाधव माहुरगडची रायबागन सावित्रीबाई देशमुख- न्यू मॅन प्रकाशन परभणी 2015


**प्रा. डॉ. जाधव दत्ता उध्दव**